# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## श्री घुबे व श्री शेवाळे यांचा कुलगुरुंचे हस्ते सेवानिवृत्तीप्रसंगी सत्कार
## विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

अमरावती.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते परीक्षा विभागाचे वरीष्ठ सहाय्यक श्री ज्ञानेश्वर घुबे आणि प्रशासन विभागात वाहनचालक पदावर कार्यरत श्री सुभाष शेवाळे यांचा सेवानिवृत्तीप्रसंगी शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. सौ. घुबे व सौ. शेवाळे यांचा सत्कार साडीचोळी व चांदीचा करंडा देवून सहा. कुलसचिव कु. मोनाली वानखडे यांनी केला. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, प्रमुख अतिथी म्हणून व्य.प. सदस्य तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख, कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उभयता सत्कारमूर्ती श्री ज्ञानेश्वर घुबे, सौ. घुबे, श्री सुभाष शेवाळे, सौ. शेवाळे उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, अनुभवी कर्मचारी सेवानिवृत्त होतात, याची सातत्याने चिंता वाटत असते; पण सर्व कर्मचाऱ्यांचे सकारात्मक सहकार्य लाभत असल्यामुळे कर्मचारी संख्येने कमी होत असले तरी, कामाची गुणवत्ता आणि कार्यतत्परता यामध्ये कुठलीही कमतरता येत नाही. वाहनचालक म्हणून श्री सुभाष शेवाळे यांनी उत्तम सेवा दिलेली आहे. स्वतः जोखीम स्वीकारुन वाहनात बसणाऱ्यांची सुरक्षा करण्याचे कार्य वाहनचालक म्हणून त्यांनी निष्ठेने पार पाडले आहे. परीक्षेसारख्या संवेदनशील विभागात श्री ज्ञानेश्वर घुबे यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करुन विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढविली आहे. या विद्यापीठात संस्थेसाठी जगणारे कर्मचारी आहेत. संस्थेला जपले पाहिजे, अशी भावना त्यांच्यामध्ये आहे आणि जेव्हा अशी माणसे सेवानिवृत्त होतात, तेव्हा निश्चितच मनाला दुःख होते. कर्मचारीरुपी असलेल्या परिवाराची एकजुट असल्यामुळे विद्यापीठाची यशस्वी वाटचाल सातत्याने सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, मन लावून इमानेइतबारे, शिस्तबद्ध आणि अचूकपणे काम करणारे कर्मचारी या विद्यापीठाला लाभले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या दोनही कर्मचाऱ्यांची कारकीर्द यशस्वी राहिली आहे. प्रमुख अतिथी डॉ.एस.के. ओमनवार म्हणाले, दक्षतेने श्री घुबे व श्री शेवाळे यांनी कार्य केले आहे. अमरावती विद्यापीठासारखे कामाचे कल्चर इतर विद्यापीठांमध्ये पाहायला मिळत नाही. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर हे उत्कृष्ट मार्गदर्शक असल्यामुळे त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे.

सत्कारमूर्ती श्री ज्ञानेश्वर घुबे मनोगतात म्हणाले, दीडहजार विद्यार्थी संख्येवरुन आज पाच लाख विद्यार्थी संख्या वाढली आहे. दिवसेंदिवस कर्मचारी संख्या कमी होत आहे. अधिकाऱ्यांवरसुद्धा कमी कर्मचाऱ्यांमध्ये काम करण्याचा ताण वाढतो आहे. विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी निष्ठेने काम करतात, म्हणून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट सेवा मिळत आहे. तर श्री सुभाष शेवाळे म्हणाले, कुलगुरुंचे वाहनचालक म्हणून काम करता आले, हे मी माझे भाग्य समजतो. मला सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले आहे. विद्यापीठाच्या विकासामध्ये माजी कुलगुरुंचे, प्राधिकारिणींच्या सदस्यांचे आणि सर्व कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण करुन पाहुण्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले व सत्कारमूर्तींना रजा रोखीकरणाचा धनादेश प्रदान केला. नियंत्रण अधिकारी म्हणून प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख यांनी, तर संघटनेच्यावतीने कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री दिपक काळे यांनी पतसंस्थेतर्फे उभयतांचा सत्कार करुन कल्याण निधी व भागभांडवल राशीचा धनादेश प्रदान केला. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी व सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३१/०७/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी